पुण्य नगरी ५ शनिवार, १५ नोव्हेंबर २०२५



# 'विवेकानंद'च्या बॅडमिंटन संघांची निवड

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ आणि गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाबाई डिफेन्स बॅडमिंटन ॲकॅडमी येथे झालेल्या कोल्हापूर झोनल महिला आणि पुरुष बॅडमिंटन स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालयाच्या महिला व पुरुष संघांनी दमदार कामगिरी करून सुवर्णपदक पटकावले. या दोन्ही संघांनी अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, आष्टा येथे होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत इंटरझोनल स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले. या खेळाडूंना प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा • शनिवार दि. १५ नोव्हेंबर २०२५

# गीतांजली साठे यांचे एमपीएससी परीक्षेत यश

## • पाचहून अधिक स्पर्धा परीक्षांमध्ये यशाचा चढता आलेख कायम

**जनप्रवास : कोल्हापूर**

गीतांजली गोपाळ साठे रा.मल्हारपेठ (सध्या रा.फुलेवाडी) यांनी एमपीएससीच्या २०२४ च्या परीक्षेत लख्ख यश संपादन केले. राजपत्रित वर्ग एक अधिकारी पदी त्यांनी गवसणी घातल्याबद्दल पंचक्रोशीतून त्यांचे कौतूक होत आहे. मुख्याध्यापक गोपाळ आकाराम साठे यांच्या त्या कन्या होत.



गीतांजली साठे यांचे प्राथमिक शिक्षण तारळे, तालुका पाटण येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा सयाजीराव हायस्कूल, सातारा येथे तर महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेजमध्ये झाले. पुढे त्यांनी शासकीय इंजीनियरिंग कराड येथून मेकॅनिकल इंजिनिअरची पदवी प्राप्त केल्यानंतर विद्या प्रबोधिनी अकॅडमी कोल्हापूरमध्ये एमपीएससी या स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. पहिल्याच प्रयत्नांती त्यांनी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकची पोस्ट मिळवली. त्यानंतर यशाचा आलेख सदैव चढताच राहिला. पुढे विक्रीकर निरीक्षक, अन्न औषध प्रशासन (फूड इन्स्पेक्टर), कर निर्धारण, प्रशासकीय अधिकारी गट अ नगरपरिषदा आदी एकापेक्षा एक सरस अशा स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्या. त्यानंतर विक्रीकर निरीक्षक हे पद निवडले व ठाणे येथे रुजू झाल्या. पण राजपत्रित वर्ग एक अधिकारी पद मिळवावयाचे त्यांचे ध्येय त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. दरम्यानच्या कालावधीत लग्न झाल्यानंतरही त्यांनी दररोज नोकरी व संसार सांभाळत अभ्यासाचा धडाका सुरूच ठेवला. अखेर अथक प्रयत्नातून त्यांनी एमपीएससीच्या २०२४ परीक्षेमध्ये यश प्राप्त केले.

त्यांचे पती पीएसआय म्हणून मुंबई येथे कार्यरत आहेत. वडील मुख्याध्यापक गोपाळ साठे हे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या दि इंग्लिश स्कूल चंदुर या शाळेतून सेवानिवृत्त झाले आहेत. आई गृहिणी आहेत. त्यांचा भाऊ आशिष साठे यांनीही स्पर्धा परीक्षेतून इंटेलिजिलियंट ब्युरोमध्ये नोकरी मिळवली असून ते कार्यरत आहेत. साठे यांना त्यांचे आई-वडील व पतीकडून राजपत्रित वर्ग एक अधिकारी पद मिळवण्यासाठी प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळाले. आपले यश हे अहोरात्र कष्ट, निरंतर वाचन चिकाटी, धाडस, व जेष्ठांचे मार्गदर्शन यातून मिळाले असल्याचे त्यांनी नमूद केले.